**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय उप आयुक्त, जळगांव यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव यांचे कार्यालय, जळगांव**
**मायादेवी मंदिरा समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जवळ, हतनुर वसाहत, महाबळ रोड, जळगांव. ४२५००२**
Email ID - supdtjud.jg.mh@gov.in / dycc.jg-mh@gov.in

---

जा. क्र./DYCC/ १०७४ /२०२६ दिनांक -२५ /०३/२०२६

**प्रति,**
**मा. धर्मादाय आयुक्त,**
**महा. राज्य. मुंबई.**

विषय: चौकशीची जाहीर नोटीस बोर्डावर लावणे बाबत.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयानुसार मा. धर्मादाय उप आयुक्त, जळगांव विभाग, जळगांव यांच्या आदेशान्वये सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव या कार्यालयातील राजस्थानी टॉक क्षत्रिय मंडळ, जळगांव ता. जि. जळगांव नोंदणी क्रमांक एफ/११५३/जळगांव या न्यासाचे चौकशी क्र. २३४/२०२५ कलम २२-३ (अ) मध्ये चौकशी करण्यात येत असून त्यांत चौकशीची जाहीर नोटीस काढण्यात आलेली आहे. ही चौकशीची जाहीर नोटीस आपल्या संकेतस्थळावर ऑन लाईन प्रसिध्द करण्यात यावी, ही नम्र विनंती.

25/3/2026

(मो. द. गाडे)
धर्मादाय उप आयुक्त,
जळगांव विभाग, जळगांव.

सोबत - चौकशीची जाहीर नोटीसची प्रत.

जा.क्र./DYCC/ १०७३ /२०२६
सार्व. न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव, मायादेवी मदिरासमोर,
समाज कल्याण भवन शेजारी,
महाबळ, जळगांव.
दिनांक : २५/०३/२०२६

# चौकशीची जाहीर नोटीस

प्रति,
श्री वेदप्रकाश वर्मा,
रा. वर्मा भवन (सदन),
जिल्हा पेठ, जळगांव ता. जि. जळगांव.

विषय :- चौकशी कामी उपस्थित राहणेबाबत.

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्र : राजस्थानी टॉक क्षत्रिय मंडळ, जळगांव ता. जि. जळगावं नोंदणी क्र. एफ/११५३/जळगांव.
चौकशी क्र. २३४/२०२५ कलम २२-३(अ).

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, श्री नारायण जे. थुदगर यांनी विषयांकित न्यासाचे कार्यकारी मंडळातील बदल करण्यासाठी बदल अर्ज क्रमांक ८१६/२०१७ व ८१७/२०१७ हा दाखल केला आहे.

प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांना अनेक वेळा संधी देऊनही त्यांनी प्रकरणात कागदपत्रांची पुर्तता केली नाही. तसेच आपण पदाधिकारी / विश्वस्त म्हणून कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही व कागदपत्रांची पुर्तता केली नाही. यावरुन अर्जदार व आपणास प्रस्तुत बदल अर्जाच्या कामकाजाबाबत कोणतेही स्वारस्य नाही असे दिसून येते. तरी प्रस्तुत न्यासाची नोंदणी रद्द का करण्यात येवू नये याबाबत खुलासा निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रस्तुत प्रकरणात आपण दिनांक १७/०४/२०२६ रोजी या कार्यालयात सुनावणीकामी हजर राहावे. आपण समक्ष हजर न राहिल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही असे समजून सदरील न्यासाची नोंदणी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

25/3/26

(मो. द. गाडे)
धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग जळगांव

ऑनलाईन संकेस्थळावर चौकशीची जाहीर नोटीस प्रसिध्द करणेकरिता प्रत,
मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Judicial Clerk